# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र.रानिआ/ग्रापनी/२००५/प्र.क्र.२९/का-०८
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दि. ३०/०८/२००५

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व ग्रामपंचायत शाखा)
(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळुन)

विषयः- माहे नोव्हेंबर/डिसेंबर-२००५ मध्ये मुदती संपणा-या ग्रामपंचायतींचा सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रभाग रचना व आरक्षणाबाबतचा कार्यक्रम.

महोदय,

माहे नोव्हेंबर/डिसेंबर-२००५ मध्ये मुदती संपणा-या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रभाग रचना व आरक्षणाबाबतचा १ ते ७ टप्प्यातील कार्यक्रम सोबत पाठविण्यात येत आहे. त्या प्रमाणे सदस्य संख्या निश्चित करणे, प्रभाग रचना व जागांचे आरक्षण करणे इत्यादीकरिता सन २००१ ची जनगणनेची आकडेवारी विचारात घ्यावी आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ व मुंबई ग्रामपंचायत (प्रभाग रचना, आरक्षण ई.बाबत) नियम १९६६ च्या तरतुदीनुसार प्रभाग रचना, जागांचे आरक्षण इत्यादीबाबत कार्यवाही करण्यात यावी. याबाबतीत वाडया,वस्त्या ईत्यांदीचे क्षेत्र (भुमापन क्रमांक, गट क्रमांक ई.) ज्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात समाविष्ट आहे त्या ग्रामपंचायतीच्या प्रभागात सदर वाडया, वस्त्या इत्यादींचा सामावेश करुन तसेच, सोबत जोडलेल्या प्रभाग रचना व आरक्षणाबाबतच्या सूचना विचारात घेऊन प्रभाग रचना करण्यात यावी. याबाबत मुंबई ग्रामपंचायत अधिनियम व प्रभाग रचना व आरक्षण इत्यादीबाबतचे नियम यातील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी.

तसेच माहे नोव्हंबर/डिसेंबर,२००५ या महिन्यात मुदत संपणा-या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक/पोटनिवडणुका व पुढे ढकलण्यात आलेल्या तेरा पुरग्रस्त जिल्हयातील सार्वत्रिक निवडणूंका माहे ऑक्टोबर,२००५ मध्ये घेण्यात येणार आहेत. मुंबई ग्रामपंचायत १९५८ च्या कलम १२ चे पोटकलम (१) मधील तरतुदीनुसार या ग्रामपंचायतींच्या निवडणूकांसाठी महाराष्ट्र विधान सभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादया ग्राहय धरण्याचा दिनांक ०९/०९/२००५ हा

अधिसूचित करण्यात आला आहे याची नोंद घ्यावी. या संबंधित अधिसूचना असाधारण राजपत्रात दिनांक २६ ऑगष्ट,२००५रोजी प्रसिध्द झाली असून, राजपत्राची प्रत सोबत जोडली आहे. उर्वरित निवडणूक कार्यक्रम मा.राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार योग्यवेळी निर्गमित करण्यात येईल.

आपला,

(मंगेश मोहिते)
सहायक आयुक्त
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी माहे नोव्हेंबर/डिसेंबर-२००५ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी निर्दिष्ट केलेला प्रभाग रचना व आरक्षणबाबतचा निवडणूक कार्यक्रम**

| | | |
|---|---|---|
| १ | मुंबई ग्रामपंचायती (सदस्य संख्या, प्रभाग रचना आणि पदांचे आरक्षण)नियम,१९६६मधील नियम२-अ प्रमाणे ग्रामपंचायतीसाठी एकूण सदस्य संख्या ठरविणे | दिनांक ०५/०९/२००५ सोमवार पर्यंत |
| २ | प्रारुप प्रभाग रचनेला प्राधिकृत अधिका-याने मान्यता देणे | दिनांक ०८/०९/२००५ गुरुवार पर्यंत |
| ३ | मुंबई ग्रामपंचायती (सदस्य संख्या, प्रभाग रचना आणि पदांचे आरक्षण) नियम, १९६६ मधील नियम ४, ४-अ, ४-अअ व ४-ब च्या तरतुदीनुसार आरक्षणासाठी सोडत पध्दतीने प्रभागाचे आरक्षण ठरविणे | दिनांक १२/०९/२००५ सोमवार पर्यंत |
| ४ | मुंबई ग्रामपंचायती (सदस्य संख्या, प्रभाग रचना आणि पदांचे आरक्षण) नियम, १९६६ मधील नियम २-अ नुसार प्रारुप प्रभाग रचना, आरक्षणाबाबत नियम ५ मधील पोटनियम (२) च्या ‘ नमुना ब ’ अन्वये हरकती व सूचना मागविण्यासाठी जाहीर सूचना प्रसिध्द करणे | १३/०९/२००५ मंगळवार |
| ५ | मुंबई ग्रामपंचायती (सदस्य संख्या, प्रभाग रचना आणि पदांचे आरक्षण) नियम, १९६६ मधील तरतुदीनुसार व नियम ५ मधील पोटनियम (२) च्या ‘नमूना ब’ मध्ये नमूद केल्यानुसार हरकती सादर करण्याची अंतीम तारीख | २०/०९/२००५ मंगळवार पर्यंत |
| ६ | मुंबई ग्रामपंचायती (सदस्य संख्या, प्रभाग रचना आणि पदांचे आरक्षण) नियम, १९६६ मधील नियम ५ पोटनियम (२) मधील तरतुदीनुसार ‘ नमुना ब ’ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मागविलेल्या ज्या हरकती व सूचना प्राप्त झाल्या, त्यावर निर्णय घ्यावयाचा अंतिम दिनांक | २३/०९/२००५ शुक्रवार पर्यंत |

| | | |
|---|---|---|
| ७ | मुंबई ग्रामपंचायती (सदस्य संख्या, प्रभाग रचना आणि पदांचे आरक्षण) नियम, १९६६ मधील नियम ५ मधील पोटनियम (१) मधील 'नमुना अ' मध्ये अंतीम प्रभाग रचना, आरक्षित जागा वगैरेचा तपशील प्रसिध्द करणे | २४/०९/२००५<br>शनिवार |

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक तात्काळ**
**फॅक्स/ई-मेल/स्पिड पोष्टने**

क्रमांकः-रानिआ/ग्रापंनि/२००५/प्र.क्र. २९ /का.८,
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांकः- ०५/०९/२००५

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व)(मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
(ग्रामपंचायत शाखा)

विषयः- माहे नोव्हेंबर २००५ व डिसेंबर २००५ या महिन्यात मुदती संपणा-या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका व पुढे ढकलण्यात आलेल्या तेरा पुरग्रस्त जिल्हयांतील माहे सप्टेंबर/ऑक्टांबर,२००५ मध्ये मुदती संपणा-या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांबाबत निवडणूक कार्यक्रम.

माहे नोव्हेंबर २००५ व डिसेंबर २००५ या महिन्यात मुदत संपणा-या १८० ग्रामपंचायतींच्या व निवडणुका पुढे ढकलण्यात आलेल्या तेरा पुरग्रस्त जिल्हयांतील माहे सप्टेंबर/ऑक्टोंबर,२००५ मध्ये मुदती संपणा-या २१६७ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांबाबत निवडणूक कार्यक्रम (सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे) आणि खाली नमूद केलेल्या अ, ब, क येथील पदांसाठी सार्वत्रिक निवडणुका आणि पोट निवडणुका घेणेसाठी निवडणुकांचा कार्यक्रम सोबत पाठविण्यात येत आहे.

**अ.** ज्या विसर्जित ग्रामपंचायतींची ऊर्वरित मुदत सहा महिने किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा विसर्जित ग्रामपंचायतींमधील सर्व पदे

**ब.** विभाजनामुळे अथवा अन्य कारणाने नव्याने अधिसूचित केलेल्या ग्रामपंचायतीं मधील सर्व पदे

**क.** आतापावेतो मुदती संपलेल्या ग्रामपंचायतींच्या आणि न्यायालयीन प्रकरणामुळे सार्वत्रिक निवडणूक/पोट निवडणुका न घेतलेल्या परंतु आता न्यायालयीन निर्णयामुळे निवडणुका घेणे आवश्यक असलेल्या ग्रामपंचायती अथवा इतर अन्य कारणास्तव मुदत संपली असतानाही ज्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका अद्याप घेतलेल्या नाहीत अशा ग्रामपंचायतीतील रिक्त पदे.

२. प्रभाग रचना जागांचे आरक्षण इ. करिता २००१ च्या जनगणनेची आकडेवारी विचारात घ्यावी. प्रभाग रचना,आरक्षण इ. करिता दिनांक ३०/०८ /२००५ रोजी कार्यक्रम देण्यात आला आहे.

३. मुंबई ग्रामपंचायती अधिनियम, १९५८ चे कलम १२ चे पोट कलम (१) मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी महाराष्ट्र विधानसभेंसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादया ग्राहय धरण्याचा दि. ०९/०९/२००५ हा अधिसूचित करण्यात आला आहे. प्रभागनिहाय मतदार यादया, अधिप्रमाणित करण्यापूर्वी संबंधित प्रभागाच्या मतदारांच्या (नागरिकांच्या) माहितीसाठी दिनांक २६/०९/२००५ रोजी, प्रारुप स्वरुपात प्रसिध्द करण्यात याव्यात. या यादीमध्ये लेखनिकांच्या चुका किंवा दुस-या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झाले असल्यास अथवा अधिसूचित केलेल्या तारखेस विधानसभा मतदार यादीत नावे असूनही त्यांची नावे चुकून प्रभागनिहाय मतदार यादीत समाविष्ट करावयाची राहून गेली असल्यास, अथवा वगळण्यात आली आलेल्या मतदारांची नांवे यादीमध्ये वगळलेली नसल्यास त्यांची नांवे पुरवणी यादीद्वारे समाविष्ट करावीत अथवा वगळावीत. याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हा मतदार नोंदणी अधिकारी किंवा त्यांनी या निवडणुकीसाठी अथवा मतदार यादी तयार करण्यासाठी आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या अधिका-यांनी सदर दुरुस्त्या अंत्यंत काळजीपूर्वक कराव्यात. त्यानंतर अंतिम मतदार यादी दिनांक ३०/०९/२००५ रोजी अधिप्रमाणित करण्यात यावी, आणि ती मतदारांची अधिप्रमाणित यादी अंतिमरित्या प्रसिध्द करण्यात यावी.

४. **ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेताना राज्य निवडणूक आयोगाचे परिपत्रक क्र.रानिआ/१०९९/प्र.क्र.५२/९९/पंरा, दि. १३/१२/१९९९ अन्वये आवश्यक कार्यवाही करावी.**

५. ज्या ग्रामपंचायतींच्या विभाजनाचे प्रस्ताव कोणत्याही टप्प्यात प्रलंबित आहेत त्या प्रस्तावाचा विचार न करता मुदत संपणा-या ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेणे हे भारतीय संविधानातील तरतुदीनुसार आवश्यक आहे. तरी अशा सर्व ग्रामपंचायतींच्या निवडणुकांच्या कार्यक्रम लावण्यात यावा. या आदेशांचे पालन न चुकता करावे याची विशेष नोंद घ्यावी.

६. राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक-एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.२९/का.१०, दिनांक १२ जुलै, २००१ अन्वये उमेदवारांना दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याबाबत तसेच आदेश क्रमांक-एसईसी/जीईएन-२००२/प्र.क्र.८५/का.०५, दिनांक १५ मार्च,२००४ अन्वये

उमेदवाराकडे अथवा त्याच्या नातेवाईकाकडे किती संपत्ती आहे. उमेदवारावर कुठलाही अपराध केल्याचा आरोप आहे काय, त्याची शैक्षणिक पात्रता काय आहे, इत्यादीबाबत **घोषणापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. सर्व निवडणूक निर्णय अधिका-यांना हे घोषणापत्र घेण्याबाबत योग्य त्या सूचना देण्यात याव्यात.**

७. ज्यांना आरक्षित जागांवर ग्रामपंचायत निवडणूक लढविण्याची इच्छा आहे, त्यांनी संबंधित आरक्षित जागांकरिता आवश्यक ते प्रमाणपत्र वेळीच उपलब्ध करुन घेण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी सर्व संबंधितांना स्थानिक वृत्तपत्रात जाहीर सूचना देवून अवगत करावे.

८. निवडणुकांच्यावेळी उमेदवार अर्ज भरतांना अनेक उमेदवार अर्ज भरतात. परंतु नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या वेळी एक उमेदवार सोडून अन्य सर्व उमेदवार अर्ज मागे घेतात. अशा वेळी तो उमेदवार इतर उमेदवारांवर दबाव आणून उमेदवारी अर्ज मागे घेण्यास लावतो ही शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे या पुढे असे प्रसंग घडल्यास राज्य निवडणूक आयोगास त्याबाबत सविस्तर अहवाल तात्काळ पाठवावा व राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिल्यानंतरच त्या उमेदवाराला विजयी घोषित करावे असे आदेश रानिआ/मनपा २००४/प्र.क्र.३७/का.५, दि. २३/१२/२००४ अन्वये दिलेले आहेत त्याचे पालन करावे.

९. ज्या जिल्हयांमध्ये अशा त-हेच्या निवडणुका घेणे आवश्यक राहणार आहे आणि त्यासाठी जो अधिकारी/कर्मचारी वर्ग नेमून देण्यात आलेला आहे किंवा ज्यांना निवडणुकीची कर्तव्ये देण्याची शक्यता आहे त्या अधिका-यांची अथवा कर्मचा-यांची तसेच ज्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका होणार आहेत ती गांवे ज्या पोलिस अधिका-यांच्या अधिकार क्षेत्रात येत असतील त्या पोलिस अधिका-यांच्या सुध्दा निवडणुकांची आचारसंहिता अमलात असतांना बदल्या करण्यात येऊ नयेत. ग्रामपंचायत क्षेत्रातील पूर परिस्थिती व साथीचे रोग यांच्यावर उपाययोजना करणे इत्यादी संदर्भातील कोणत्याही कामकाजास आचारसंहितेची बाधा असणार नाही. मात्र या संदर्भात होणा-या कार्यक्रमात मंत्री, खासदार, आमदार व इतर, नगरसेवक व पदाधिकारी यांचा सहभाग राहणार नाही, व आचारसंहितेच्या कालावधीत कोणत्याही प्रकाराचा उद्घाटनाचा व भूमिपुजन कार्यक्रम होणार नाही याची काळजी घेण्यात यावी. आवश्यकता असल्यास पूर परिस्थिती व साथीचे रोग याच्या उपाययोजनेत समन्वय असावा यासाठी राज्य शासन विशेष अधिकारी नेमु शकेल.

१०. संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रांमध्ये निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आचारसंहिता लागू राहील.

११. सोबतच्या कार्यक्रमाप्रमाणे उपरोक्त ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेण्यात येवून पूर्तता अहवाल त्वरित राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात यावा. **याबाबत कोणत्याही प्रकारे निवडणूक प्रक्रियेशी संबंधित चुका किंवा व्यत्यय होणार नाही व निवडणुक प्रक्रिया नि:पक्षपातीपणे व रितसर पार पाडली जाईल याची दक्षता घ्यावी. याबाबत कोणत्याही प्रकारची चुक झाल्यास अथवा जाणिवपुर्वक नियमबाहय कृती केल्याचे आढळल्यास संबंधिताविरुध्द आयोगाचे परिपत्रक दिनांक ०६/०८/२००५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारवाई केली जाईल.**

मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांचे आदेशाने,

( चाँद गोयल )
प्रधान सचिव,
राज्यनिवडणूक आयोग,महाराष्ट्र

प्रत : १. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२. अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई त्यांना कळविण्यात येते की, जिल्हाधिकारी यांच्या मागणीनुसार त्यांना मतपेटया व इतर साहित्य वापरण्यास कृपया परवानगी देण्यात यावी.
४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
६. विभागीय आयुक्त (सर्व) यांजकडे उचित कार्यवाहीसाठी
७. संचालक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई ४ त्यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिका-यांना आवश्यक साधनसामग्री पुरविण्यात यावी. तसेच मतपत्रिका व इतर छपाई विहित वेळेत पूर्ण करुन देण्याची कृपया व्यवस्था करावी
८. पोलीस महानिरीक्षक (सर्व) महाराष्ट्र राज्य,.
९. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई ४०० ०३२
१०. निवड नस्ती (२ प्रती)

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी आदेशीत केलेला
माहे नोव्हेंबर/डिसेंबर,२००५ या महिन्यात मुदती संपणा-या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक
निवडणूकांचा व निवडणूका पुढे ढकलण्यात आलेल्या १३ पुरग्रस्त जिल्हयातील
सप्टेंबर/ऑक्टोंबर,२००५ या महिन्यात मुदती संपणा-या ग्रामपंचायतींच्या
निवडणूकासाठी निवडणूक कार्यक्रम

| अ-क्र | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्यांची / पूर्ण करण्यांची तारीख |
|---|---|---|
| | मतदार यादी ग्राहय धरण्याचा दिनांक | ०९/०९/२००५ शुक्रवार |
| १ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम १९५९ मधील नियम ३ चे पोटनियम (४) नुसार प्रारुप मतदार यादी लोकांच्या परिक्षणासाठी उपलब्ध करणे. | २६/०९/२००५ सोमवार |
| २ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम १९५९ मधील नियम ३ चे पोटनियम (५) नुसार मतदार यादीची जाहीर नोटीस प्रसिध्द करणे व अंतीम यादी प्रसिध्द करणे. | ३०/०९/२००५ शुक्रवार |
| ३ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक)नियम १९५९ मधील नियम ७ मधील पोटनियम (१) अन्वये राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाची प्रत व पोटनियम (२)नुसार नमूना अअ मध्ये निवडणूकीची नोटीस प्रसिध्द करणेचा दिनांक | ०३/१०/२००५ सोमवार |
| ४ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक)नियम १९५९ मधील नियम ७ मधील पोटनियम (१) अन्वये नामनिर्देशन पत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमूना अअ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | ०३/१०/२००५ सोमवार ते ०८/१०/२००५ शनिवार पर्यंत सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० पर्यंत |
| ५ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक)नियम १९५९ मधील नियम ७ मधील पोटनियम (१) चा खंड (ब) नुसार नामनिर्देशन पत्रे छाननी करण्याचा दिनांक व वेळ (नमूना अअ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | १०/१०/२००५ सोमवार सकाळी ११.०० पासुन |

| | | |
|---|---|---|
| ६ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक)नियम १९५९ मधील नियम ७ मधील पोटनियम (१) चा खंड (क) नुसार नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा  दिनांक व वेळ (नमूना अअ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | १३/१०/२००५ गुरुवार सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० पर्यंत |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमुन देण्याचा तसेच अंतीमरित्या निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | १३/१०/२००५ गुरुवार दुपारी ३.०० नंतर |
| ८ | मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम १९५९ मधील नियम  ७ मधील पोटनियम (१ )  चा खंड (ड) नुसार आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | २३/१०/२००५ रविवार सकाळी ७.३० ते सांय ५.३० पर्यंत |
| ९ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक व वेळ | २५/१०/२००५ मंगळवार सकाळी ९.०० वा. पासून |
| १० | मुंबई ग्रामपंचायती (निवडणूक)नियम १९५९ मधील नियम ३७ नुसार ग्रामपंचायतींच्या निवडणूकीचा निकाल प्रसिध्द करण्याचा अंतीम दिनांक | २७/१०/२००५ गुरुवार |

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र